निवडणूक तात्काळ/ई-मेलद्वारे

तांत्रिक व इतर अडचणींमुळे प्रभाग रचना व आरक्षणाचा सुधारीत कार्यक्रम राबविलेल्या १० जिल्ह्यातील ११६ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/ग्रापनि-२०१७/प्र.क.१४/का-८
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - १३ सप्टेंबर २०१७

प्रति,
जिल्हाधिकारी,
(सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक, जळगाव, सातारा,
कोल्हापूर बीड, जालना, अमरावती व वाशीम- एकूण १० जिल्हे)

विषय :- तांत्रिक व इतर अडचणींमुळे प्रभाग रचना व आरक्षणाचा सुधारीत कार्यक्रम राबविलेल्या १० जिल्ह्यांतील ११६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम....

संदर्भ :- १) आयोगाचा क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१/का-८, दि.०१/०६/२०१७ रोजीचे प्रभाग रचना व आरक्षणाच्या कार्यक्रमाबाबतचे आदेश.

२) आयोगाचा क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१४/का-८, दि.११/०८/२०१७ रोजीचा सुधारीत प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम.

३) आयोगाचा क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.६/का-८, दि.०७/०७/२०१७ रोजीचा मतदार यादी कार्यक्रम.

४) आयोगाचा क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.६/का-८, दि.१९/०८/२०१७ रोजीचा नाशिक, औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम.

५) आयोगाचा क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.६/का-८, दि.२३/०८/२०१७ रोजीचा कोकण, पुणे व नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम.

महोदय / महोदया,

ज्याअर्थी, आयोगाच्या उक्त संदर्भ क्र.२ च्या कार्यक्रमानुसार प्रभाग रचना व आरक्षणाच्या सुधारीत कार्यक्रमानुसार दि.११ सप्टेंबर २०१७ रोजी संबंधित ठिकाणी अंतिम प्रभाग रचना व आरक्षणाचा नमुना-अ प्रसिध्द करण्यात येणार आहे,

त्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १०-अ अन्वये राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून उक्त नमूद केलेल्या ११६ ग्रामपंचायतींसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम सोबत परिशिष्ट-१ मध्ये जोडण्यात येत आहे.

या कार्यक्रमासाठी सर्व १० जिल्ह्यांनी त्यांच्या महसूल विभागांशी संबंधित निर्गमित केलेल्या मतदार यादीच्या सुधारीत कार्यक्रमाबाबत संदर्भ क्र.४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पत्रातील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच हा कार्यक्रम विहित मुदतीत पार पाडण्याची दक्षता घ्यावी.

मा राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

(आश्वी सरवदे-आहेर)
तहसिलदार,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत: परिशिष्ट-१

प्रत :- १) प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

वरील मतदार यादी कार्यक्रमात समाविष्ट केलेल्या सार्वत्रिक निवडणुकांबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून आपणास अहवाल प्राप्त होताच या ग्रामपंचायतींसाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ते अनुदान तात्काळ वितरित करण्याची व्यवस्था करावी.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व संबंधित).

मतदार यादी कार्यक्रमासंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती प्रमाणित करून उपलब्ध करून देण्याचे तसेच जिल्हा व तालुक्याच्या महसूल प्रशासनाशी वेळोवेळी समन्वय साधण्याचे निर्देश उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांना देण्यात यावे व या निर्देशांचे त्यांच्याकडून काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

३) संगणकीकरण शाखा, राज्य निवडणूक आयोग, यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

४) सहायक आयुक्त कार्यासन-१२ यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

५) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना उचित कार्यवाहीसाठी.

६) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

७) निवड नस्ती.

(परिशिष्ट-१)

(आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापनि-२०१७/प्र.क्र.१४/का-८, दि.१३/०९/२०१७ रोजीच्या पत्रासोबतचे सहपत्र.)

# तांत्रिक व इतर अडचणींमुळे प्रभाग रचना व आरक्षणाचा सुधारीत कार्यक्रम राबविलेल्या १० जिल्ह्यांतील ११६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम....

## (मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक शनिवार दि.०१/०७/२०१७)

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरू करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | शुक्रवार दि.१५/०९/२०१७ |
| २ | हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | शुक्रवार दि.१५/०९/२०१७ ते बुधवार दि.२०/०९/२०१७ पर्यंत |
| ३ | प्रभागनिहाय मतदार यादीची जाहिर नोटीस प्रसिध्द करणे व अंतिम यादी प्रसिध्द करणे. | शनिवार दि. २३/०९/२०१७ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेनुसार,

13/9/17

(आरती सरवदे-आहेर)

तहसिलदार

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र